# शेतकऱ्याची पत्नी



लेखक:
इद्रीस शाह

चित्रे:
रोझ मेरी सँटियागो


मराठी अनुवाद:
सुशील मेन्सन

# शेतकऱ्याची पत्नी

इद्रीस शाह



फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक शेतकऱ्याची पत्नी होती. एके दिवशी ती झाडावरून सफरचंद तोडत होती. पण अचानक एक सफरचंद तिच्या हातून सुटले आणि एका खड्डयात पडले. तिला ते खड्ड्याबाहेर काढता येईना.







तिने मदतीसाठी सभोवार पाहिले.

जवळच्या झाडावर एक पक्षी बसला होता.

ती पक्ष्याला म्हणाली, “पक्ष्या, पक्ष्या, उडत उडत

खड्ड्याजवळ जा आणि माझं सफरचंद काढून आण.”


पण पक्षी म्हणाला, “चिव, चिव, चिव,” म्हणजे, “नाही.” तो

पक्षी जरासा खट्याळ होता.

शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहे हा पक्षी!”




मग तिने एक मांजर बघितली.
ती मांजरीला म्हणाली,
“मनीमाऊ, मनीमाऊ, जोपर्यंत
पक्षी खड्यातलं माझं सफरचंद
काढून आणत नाही, तोपर्यंत
पक्ष्यावर झडप घालत राहा.”
पण मांजर म्हणाली, “म्याँव,
म्याँव,” म्हणजे, “नाही”.




ती मांजर जराशी खट्याळ होती.
शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती
खट्याळ आहे ही मनीमाऊ!”

मग तिने एका कुत्र्याला पाहिले. ती त्याला म्हणाली, “कुत्रेदादा, कुत्रेदादा, मनीमाऊमागे पळ, जोपर्यंत ती पक्ष्यावर झडप घालत नाही, जोपर्यंत तो पक्षी उडून खड्ड्यातून माझे सफरचंद आणून देत नाही.”
पण कुत्रा म्हणाला, “भो, भो, भो,” म्हणजे, “नाही.”

तो कुत्रा जरासा खट्याळ होता. शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहे हा कुत्रेदादा!”







मग तिने सभोवार पाहिले. तिला एक मधमाशी दिसली. ती मधमाशीला म्हणाली, “मधमाशीताई, मधमाशीताई, कुत्रेदादाला डंख मार, जोपर्यंत तो मनीमाऊच्या मागे पळत नाही, जोपर्यंत मनीमाऊ पक्ष्यावर झडप घालत नाही, जोपर्यंत तो पक्षी उडून खड्ड्यातून माझे सफरचंद आणून देत नाही.”


पण मधमाशी म्हणाली, “गुंssss, गुंssss,” म्हणजे, “नाही.”

मधमाशी जराशी खट्याळ होती. शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहे ही मधमाशीताई!”




मग तिने सभोवार पाहिले. तिला मधमाशी पाळणारा माणूस दिसला. ती त्याला म्हणाली, “मधवालेभाऊ, मधवालेभाऊ, मधमाशीताईला सांग की कुत्रेदादाला डंख मार, जोपर्यंत कुत्रेदादा मनीमाऊच्या मागे पळत नाही, जोपर्यंत मनीमाऊ पक्ष्यावर झडप घालत नाही, जोपर्यंत पक्षी उडून खड्ड्यातून माझे सफरचंद आणून देत नाही.”






पण मधमाशी पाळणारा माणूस म्हणाला, “मी नाही सांगणार.”
शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहेत हे मधवालेभाऊ!”

मग तिने पुन्हा सभोवार पाहिले. तिला जमिनीवर पडलेला दोरखंड दिसला.




ती त्याला म्हणाली, “दोरखंडा, दोरखंडा, मधवालेभाऊंना बांधून ठेव, जोपर्यंत ते मधमाशीताईला सांगत नाहीत की कुत्रेदादाला डंख मार, जोपर्यंत कुत्रेदादा मनीमाऊच्या मागे पळत नाहीत, जोपर्यंत मनीमाऊ पक्ष्यावर झडप घालत नाही, जोपर्यंत पक्षी उडून खड्ड्यातून माझे सफरचंद आणून देत नाही.”




पण दोरखंडाने ना हूं केले ना चूं. शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहे हा दोरखंड!”


मग तिने सभोवार पाहिले. यावेळी तिला आग दिसली. ती आगीला म्हणाली, “आग, आग, दोरखंडाला जाळून टाक, जोपर्यंत तो मधवालेभाऊंना बांधत नाही, जोपर्यंत मधवालेभाऊ मधमाशीताईला कुत्रेदादाला डंख मारायला सांगत नाहीत, जोपर्यंत कुत्रेदादा मनीमाऊच्या मागे पळत नाहीत, जोपर्यंत मनीमाऊ पक्ष्यावर झडप घालत नाही, जोपर्यंत पक्षी उडून खड्ड्यातून माझे सफरचंद आणून देत नाही.”



पण आगीने ना हूं केले ना चूं. तिने दोरखंडाला जाळले नाही. शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहे ही आग!”


मग तिने पुन्हा सभोवार पाहिले. तिला पाण्याचे डबके दिसले. ती म्हणाली, “पाण्या, पाण्या, आगीला विझवून टाक, कारण ती दोरखंडाला जाळत नाहीये, कारण तो मधवालेभाऊंना बांधत नाहीये, कारण मधवालेभाऊ मधमाशीताईला कुत्रेदादाला डंख मारायला सांगत नाहीयेत, कारण कुत्रेदादा मनीमाऊच्या मागे पळत नाहीयेत, कारण मनीमाऊ पक्ष्यावर झडप घालत नाहीये, कारण पक्षी उडून खड्ड्यातून माझे सफरचंद आणून देत नाहीये.” पण पाण्याने ना हूं केले ना चूं. त्याने आगीला विझवले नाही. शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहे हे डबके!”





मग शेतकऱ्याच्या पत्नीने
सभोवार पाहिले.


तिला एक गाय दिसली.



ती गायीला म्हणाली, “गायमाते, गायमाते, डबक्यातलं पाणी पिऊन टाक. कारण ते आगीला विझवत नाहीये, कारण आग दोरखंडाला जाळत नाहीये, कारण दोरखंड मधवालेभाऊंना बांधत नाहीये, कारण मधवालेभाऊ मधमाशीताईला कुत्रेदादाला डंख मारायला सांगत नाहीयेत, कारण कुत्रेदादा मनीमाऊच्या मागे पळत नाहीयेत, कारण मनीमाऊ पक्ष्यावर झडप घालत नाहीये, कारण पक्षी उडून खड्ड्यातून माझे सफरचंद आणून देत नाहीये.” पण गाय फक्त म्हणाली, “हम्माssss,” म्हणजे, “नाही.” शेतकऱ्याची पत्नी उद्गारली, “किती खट्याळ आहे ही गाय!”



शेतकऱ्याच्या पत्नीने पुन्हा सभोवार पाहिले. तिला पुन्हा तो पक्षी दिसला. ती पक्ष्याला म्हणाली, “जरा गायीला चोच मार.” पक्षी म्हणाला, “ठीक आहे, मी गायीला चोच मारतो. पण तू मला खड्ड्यातून सफरचंद काढून आणायला सांगू नकोस.”




शेतकऱ्याची पत्नी म्हणाली, “ठीक आहे, तू एकदा चोच तरी मार.” मग खट्याळ पक्ष्याने गायीला चोच मारली.




लगेच गाय डबक्यातील पाणी पिऊ लागली. पाणी आगीला विझवू लागले.

आग दोरखंड जाळू लागला. दोरखंड मधमाशी पाळणाऱ्या माणसाला बांधू लागला.

मधमाशी पाळणाऱ्या माणसाने मधमाशीला आज्ञा केली. मधमाशी कुत्र्याला डंख मारू लागली. कुत्रा मांजरीमागे पळू लागला. मांजरीने गायीला चोच मारणाऱ्या पक्ष्यावर झडप घातली. पक्षी वेगाने फडफड करत उडाला आणि खड्ड्याजवळ गेला.






मग वाऱ्याचा एक मोठा झोत खड्ड्यात गेला



आणि त्याने शेतकऱ्याच्या पत्नीचे सफरचंद खड्ड्यातून वर काढले.



त्यानंतर सगळीकडे आनंदीआनंद झाला.

समाप्त